ला. प्र. वि.

**कार्यालय पोलीस उप अधिक्षक, लाच लुचपत प्रतिबंधक विभाग, जालना**
**टोल फ्री क्रमांक - 1064**
**कार्यालय दुरध्वनी क्र :- 02482-220252**

**:: प्रेस नोट ::** **दिनांक :- 01.06.2021.**

**विभागीय सहसंचालक उच्च शिक्षण कार्यालय, पदमपुरा, औरंगाबाद येथील वरीष्ठ लिपीक श्री. ज्ञानोबा बळीराम निर्मळ यांना 9,500/- रुपयांची लाच घेतांना लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, जालनाच्या पथकाने रंगेहाथ पकडले.**

| | | | |
|---|---|---|---|
| 1 | आरोपीचे नाव, हुद्दा व पत्ता | :- | श्री. ज्ञानोबा बळीराम निर्मळ वय 54 वर्ष व्यवसाय नोकरी वरीष्ठ लिपीक, विभागीय सहसंचालक उच्च शिक्षण कार्यालय, औरंगाबाद ह.मु. घर नं 05, मातोश्रीनगर, मातोश्री चौक, गारखेडा परीसर, औरंगाबाद मुळ रा. हिवरा गोवर्धन ता. परळी जि.बीड (वर्ग - 3) |
| 2 | गुन्हा घडला तारीख व ठिकाण | :- | दिनांक 01.06.2021 रोजी विभागीय सहसंचालक उच्च शिक्षण कार्यालय, औरंगाबाद येथे |
| 3 | लाचेची रक्कम | :- | 9,500/- रुपये. |

याबाबत हकीगत अशी की, यातील तक्रारदार यांनी तक्रार दिली कि, ते अंबड जि. जालना येथील महाविदयालयात ग्रंथालय परीचर म्हणुन माहे एप्रिल 2019 मध्ये सेवानिवृत्त झाले असुन सेवानिवृत्तीनंतर त्यांनी त्यांचे सेवापट पडताळणी करण्यासाठी विभागीय सहसंचालक उच्च शिक्षण कार्यालय, पदमपुरा, औरंगाबाद अर्ज केला होता, त्यांचे सेवापट पडताळणी प्रशासन अधिकारी श्री.सुर्यवंशी यांचे कडुन करुन देतो, असे म्हणुन विभागीय सहसंचालक उच्च शिक्षण कार्यालयातील वरीष्ठ लिपीक श्री. ज्ञानोबा निर्मळ यांनी तक्रारदार यांचेकडे 9,500/- रु लाचेची मागणी केली. सदर कामासाठी तक्रारदार यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, जालना येथे संपर्क साधून तक्रार दिली.

सदर तक्रारीवरुन दिनांक 01.06.2021 रोजी लाचेची पडताळणी केली असता, वरीष्ठ लिपीक श्री. ज्ञानोबा निर्मळ यांनी तक्रारदार यांचे सेवापट पडताळणी प्रशासन अधिकारी श्री.सुर्यवंशी यांचे कडुन करुन देतो असे म्हणुन तक्रारदार यांचेकडे 9,500/- रु लाचेची मागणी केल्याचे निष्पण्ण झाल्याने सापळा लावला असता वरीष्ठ लिपीक श्री. ज्ञानोबा निर्मळ यांनी त्यांचे कार्यालयात तक्रारदार यांचे सेवापट पडताळणी प्रशासन अधिकारी श्री.सुर्यवंशी यांचे कडुन करुन देतो, असे म्हणुन 9,500/- रुपये लाचेची रक्कम स्वत: पंचासमक्ष करुन स्विकारली असतांना, त्यांना लाचलुचपत प्रतिबंधक विभाग जालनाचे पथकाने विभागीय सहसंचालक उच्च शिक्षण कार्यालय, औरंगाबाद येथे रंगेहाथ पकडले आहे.

लोकसेवक श्री. ज्ञानोबा बळीराम निर्मळ वय 54 वर्ष व्यवसाय नोकरी वरीष्ठ लिपीक, विभागीय सहसंचालक उच्च शिक्षण कार्यालय, औरंगाबाद ह.मु. घर नं 05, मातोश्रीनगर, मातोश्री चौक, गारखेडा परीसर, औरंगाबाद मुळ रा. हिवरा गोवर्धन ता. परळी जि.बीड (वर्ग - 3) यांचे विरुध्द गुन्हा दाखल करण्याबाबत पुढील कार्यवाही चालु आहे.

तसेच ॲन्टी करप्शन ब्युरो कडुन आवाहन करण्यात येते की, कोणी लोकसेवक शासकीय कामासाठी लाचेची मागणी करीत असल्यास किंवा खाजगी व्यक्ती मार्फत कोणी लाचेची मागणी करीत असल्यास 02482-220252, तसेच टोल फ्री क्रमांक 1064 वर संपर्क करावा. तसेच पोलीस उप अधिक्षक जालना मो.नं. 8975762906, पोलीस निरीक्षक मो.नं. 8390757835, 9823216788 वर संपर्क करावा.

पोलीस उप अधिक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, जालना